| | |
|---|---|
| **MHAH070004632025** | सत्र खटला क्र.१७/२०२५ आदेश नि.४७<br>९. सुरजित उर्फ सुरज उर्फ मन्ना हरजित सिंग<br>वि.महा. सरकार |

१. प्रथमखबर वाचली असता असे निदर्शनास येते की, दि.११.११.२०२४ रोजी फिर्यादी संकेत सुभाष लोळगे हा साकुर येथील त्यांचे कान्हा ज्वेलर्स दुकानात दुपारी १.३० वा.चे सुमारास ठमाजी जोरी नावाचे ग्राहकाला सोन्याचे भाव सांगत असताना अचानक दुकानात पाच अनोळखी इसम आले. त्यांचे तोंड बांधलेले होते व त्यांच्या हातात पांढरे हातमोजे होते. त्यांच्यापैकी तीन जणांकडे गावठी कट्टे (पिस्तुल) होते. त्यांनी गावठी कट्टा फिर्यादी संकेतला दाखवून दम दिला की, "तु खाली बस". गावठी कट्टा दाखविल्याने फिर्यादी संकेत घाबरुन काउंटरच्या खाली बसला. दुकानात आलेल्या ग्राहकास "तु शांत बस" असे म्हणून त्याला खाली बसविले. त्यांच्यापैकी एक जण काउंटरच्या आतमध्ये चांदीचे व सोन्याचे तयार दागिने काढून काउंटरवर ठेवत होता. त्या पाच जणांपैकी तीन इसमांनी त्यांचेसोबत आणलेल्या बॅगमध्ये ते भरले व एक जण दुकानाचे दारावर गावठी कट्टा घेवून उभा होता. त्यानंतर ते सर्व इसम फिर्यादी संकेतच्या दुकानातील सोन्या चांदीचा सुमारे ५२,४१,६००/- रुपये किंमतीचा माल बॅगमध्ये भरुन घेवून दुकानाच्या बाहेर जावून हवेत तीन वेळा गोळीबार करुन दोन मोटार सायकलवर बसून मांडवेच्या दिशेने पळून गेले. या आशयाची प्रथमखबर फिर्यादी संकेत लोळगे यांनी दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), हत्यार अधिनियम ३/२५ अन्वये गुन्हा रजि. क्र.४०२/२०२४ दि.११.११.२०२४ रोजी रात्री ९.२९ वा. घारगाव पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला.

२. गुन्हा रजि. क्र. ४०२/२०२४ चे तपासात असे निदर्शनास आले की, आरोपी क्र.१ ते ९ यांनी पुर्वनियोजित कट रचून बारामती शहरातील दोन काळ्या रंगाच्या पल्सर मोटारसायकली चोरुन आणल्या. आरोपी क्र.१, ७ व ८

यांनी आरोपी क्र.**९** यास पंजाब येथून बोलावून घेतले. अर्जदार/आरोपी क्र.७ ने त्याच्या राहत्या घरात **आरोपी क्र.९ ला राहण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली.** आरोपी क्र.१ सोने काढून देत होता व आरोपी क्र.५ व **९ हा सोने बॅगमध्ये भरत होते. दुकानाच्या बाहेर लोकांची गर्दी झालेली असल्याने आरोपी क्र.९ ने हवेत पिस्तुलीमधून एक गोळी फायर केली.** अशाप्रकारे **अर्जदार/आरोपी क्र.९ ची गुन्हयातील भुमिका सक्रीय, ठोस व महत्वाची आहे**.

३. तपासांती भारतीय दंड संहिता कलम ६१ (२) व ४९ तसेच शस्त्र अधिनियम कलम ७, २७ ही वाढवून दि.२०.०५.२०२५ रोजी अर्जदार/आरोपी क्र.९ व अन्य ८ आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. अर्जदार/आरोपी सुरजित उर्फ सुरज उर्फ मन्ना हरजित सिंगचे जामीन अर्जातील कथन व त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.बी.आरोटे यांचा युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी निष्पाप आहे. त्याचा सदर गुन्हयाशी काहीही संबंध नाही. अर्जदार/आरोपीस सदर गुन्हयात खोटे गोवले आहे. सदर घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. अर्जदार/आरोपीकडून कोणतीही वस्तू जप्त नाही. सह आरोपींच्या कथीत जबाबाच्या आधारेच अर्जदार/आरोपीला गुन्हयात खोटे गोवले आहे. सदर गुन्हयातील काही आरोपी जामीनावर सुटले आहेत. त्यामुळे समान न्यायतत्वाचे आधारावर सदर अर्जदार/आरोपीस जामीन मंजूर करावा. अर्जदार/आरोपीस आरोपीस सदर गुन्हयात जोडणारा कोणताही पुरावा नाही. कायदयानुसार सह आरोपींचे जबाब इतर सह आरोपींविरुद्ध ग्राहय धरता येत नाही.सह आरोपीच्या कथित जबाबाव्यतिरिक्त अर्जदार/आरोपीला गुन्हयाशी जोडण्यासाठी इतर कोणताही पुरावा उपलब्ध नाही. अर्जदार/आरोपीला गुन्हयात खोटे गोवण्यासाठी खोटी व बनावट कथा रचली आहे. अर्जदार/आरोपीवर कोणतीही कलमे लावलेली नाहीत. अर्जदार/आरोपीने कथीत कटात कसा सहभाग घेतला याचा एकही प्रसंग किंवा पद्धत नमुद केलेली नाही. अर्जदार/आरोपी तपास यंत्रणेला मदत करेल. अर्जदार/आरोपीची कोठडीतील चौकशीची आवश्यकता

नाही. अर्जदार/आरोपीस जामीनावर सोडल्यास प्रत्येक तारखांना हजर राहील. अर्जदार/आरोपी न्यायापासून पळून जाणार नाही आणि तपास यंत्रणेला सहकार्य करेल. अभियोगपक्षाच्या पुराव्यांची छेडछाड करणार नाही. न्यायालयाच्या अटींचे पालन करेल.

५. अर्जदाराचे सुविद्य विधीज्ञ श्री.एस.बी.आरोटे यांचा युक्तीवाद पुढे असा आहे की, सह आरोपींना सदर गुन्हयात जामीन मिळालेला आहे. अर्जदार/आरोपीस ०३.०४.२०२५ रोजी अटक केली. आरोपी क्र.१ ते ४ यांना ओळख परेडमध्ये ओळखले आहे. अर्जदार/आरोपीस पंजाब येथे अटक केली. सदरची घटना दि.११.११.२०२४ रोजी दुपारी १.३० वा. घडली. प्रथमखबर दि.११.११.२०२४ रोजी रात्री ९.३० वा. देण्यात आली. प्रथमखबर देण्यास विलंब आहे. अर्जदार/आरोपीकडून कोणतीही जप्ती नाही.

६. सुविद्य अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.वाकचौरे यांचे म्हणणे नि.४९ मधील कथन व युक्तीवाद असा आहे की, अर्जदार/आरोपी क्र.९ व सह आरोपी यांनी गुन्हयाचा कट रचुन फरार आरोपी क्र.८ धोंडया महादु जाधव याच्या सांगण्यावरुन सह आरोपी क्र.१, २ व ४ यांना सोबत घेवून बारामती शहरातून दोन मोटार सायकली चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी क्र.८ हा गुन्हयाचा मास्टरमाईंड आहे. सदर गुन्हयाचा संपुर्ण कट हा अर्जदार/आरोपी व सह आरोपी यांनी रचल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी क्र.८ च्या सांगण्यावरुनच सह आरोपी क्र. १, ७ व अर्जदार/आरोपी क्र.९ यांनी गुन्हा करण्याचा कट रचला तसेच गुन्हयातील सह आरोपींना सोबत घेवून बारामती शहरातून दोन मोटारसायकल चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. अर्जदार/आरोपीविरुद्ध नारायणगाव पोलीस ठाणे गुन्हा दाखल असून त्यात त्याला अटक केली होती. परंतु सदर प्रकरणात जामीन मिळाल्यानंतर अर्जदार/आरोपी क्र.९ ने सदरचा गुन्हा केल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार/आरोपी क्र.९ ने मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसते.

अर्जदार/आरोपीस दि.०३.०४.२०२५ रोजी अटक करण्यात आली. सदर प्रकरणातील अटक आरोपी यांनी गुन्हयातील चोरी गेलेल्या सोन्यांच्या दागिन्यांपैकी १९५.२५० ग्रॅम वजनाचे दागिने काढून दिले असून आणखी सोने, चांदीचे दागिने व रोख रक्कम जी फरार आरोपीकडून जप्त करणे आहे. दरोडा टाकल्यानंतर अर्जदार/आरोपी क्र.९ व आरोपी क्र.५ स्थानिक लोक पाठलाग करत असल्याने डोंगरात लपून राहिले. अर्जदार/आरोपी क्र.९ विरुद्ध सदर प्रकरणात सकृतदर्शनी पुरावा मिळाला असून त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे दिसून येते.

७. सुविद्य अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.वाकचौरे यांचा पुढे युक्तीवाद असा आहे की, चोरी झालेल्या दागिन्यांचे पैशातील मुल्य ५२ लाख रुपये इतके मोठे आहे. दरोडयामध्ये अर्जदार/आरोपीचा प्रत्यक्ष सहभाग व भुमिका होती. आरोपी क्र.१ चा जामीन अर्ज दि.१२.०८.२०२५ रोजी नामंजूर झाला होता. अर्जदार/आरोपीची गुन्हयातील भुमिका पिस्तुलामधून हवेत गोळीबार करण्याची गंभीर स्वरुपाची आहे. त्याच्याविरुद्ध पुरेसा पुरावा गोळा केला आहे. भारतीय दंड संहिंता कलम ३०२ सारख्या ग भीर गुन्हयाची अर्जदार/आरोपीची गुन्हेगारी पार्श्वभुमी आहे. तो मुळचा पंजाबचा राहणारा असल्यामुळे जामीन मंजूर झाल्यास तो परागंदा होईल.

८. फिर्यादीतर्फे म्हणणे नि.५३ मधील कथन असे आहे की, सदर गुन्हयातील आरोपींकडून अदयापपावेतो संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला नाही. अर्जदार/आरोपी क्र.९ हा पंजाब राज्यातील रहिवासी असून तो परप्रांतीय आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपी पुन्हा चौकशीकामी हजर राहण्याची शक्यता नाही. त्यामुळे सदर केसच्या चौकशीचे काम लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. अर्जदार/आरोपी क्र.९ हा गुन्हा घडल्यापासून दि.०३.०४.२०२५ पर्यंत फरार होता. नि.४७ मधील दिलेली कारणे खोटी, बनावट व काल्पनिक आहेत. अर्जदार/आरोपी क्र.९ विरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्यानंतर त्यास अटक

करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे. अर्जदार/आरोपी सराईत गुन्हेगार आहे. अर्जदार/आरोपी अशाप्रकारचे गुन्हे करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९. विवाद्य कथने, युक्तीवाद व दाखल कागदपत्रे यांचा साकल्याने विचार केला. फिर्यादीचे दुकानातून चोरीस गेलेल्या मालाची किंमत ५२,४१,६००/– इतकी मोठी आहे. भारतीय दंड संहिता ३१०(२) चे गुन्हयास जन्मठेपेची शिक्षा आहे. **सकृतदर्शनी गुन्हा रजि.क्र.४०२/२०२४ मधील अर्जदार/आरोपी क्र.९ ची भुमिका सक्रीय व महत्वाची आहे. त्याचा गुन्हयामध्ये पुढाकार होता असे सकृतदर्शनी निदर्शनास येते**.

१०. अर्जदार/आरोपी क्र.९ विरुद्ध नारायणगाव पोलीस ठाण्यात २०२२ सालचा एक गुन्हा नोंद आहे.

११. अर्जदार/आरोपी क्र.९ यास दि.०३.०४.२०२५ रोजी अटक करण्यात आली. अर्जदार/आरोपीस दि.०८.०४.२०२५ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली. त्यानंतर तो न्यायालयीन कोठडीत आहे.

१२. दोषारोपपत्र दाखल झाले आहे व खटला या न्यायालयाकडे वर्ग झाला आहे. २०२५ सालच्या सदर खटल्यामध्ये दोषारोप निश्चिती करुन, साक्षीदारांचे पुरावे नोंदवून, न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी लागेल. इतका कालावधी अर्जदारास न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे प्रयोजन शिल्लक राहिलेले नाही. जामीन हा नियम असून कैद हा अपवाद आहे. सबब अर्जदार/आरोपी क्र.९ हा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८३ च्या तरतुदी अन्वये जामीनास पात्र आहे.

## आदेश

अ. नियमित जामीन अर्ज नि.क्र.४७ मान्य केला आहे.

ब. घारगाव पोलीस ठाणेचा गुन्हा रजि.क्र.४०२/२०२४ चे कामी

अर्जदार/आरोपी क्र.९ सुरजित उर्फ सुरज उर्फ मन्ना हरजित सिंगचा रक्कम रुपये ८०,०००/– चा वैयक्तिक जात मुचलका व ऐपतदार जामीनदार (Solvent Surety) स्वीकारुन त्यास जामीनावर मुक्त करण्यात यावे.

क. गुन्हा रजिस्ट्रर क्रमांक ४०२/२०२४ मधील फिर्यादी व साक्षीदार यांच्याशी अर्जदार/आरोपीने कोणत्याही स्वरुपाचा संपर्क करु नये, त्यांच्यावर दबाव, दडपण, धाक, अमिष, प्रलोभन ईत्यादींचा वापर करु नये.

ड. गुन्हा रजिस्ट्रर क्रमांक ४०२/२०२४ चे पुराव्यामध्ये अर्जदार/आरोपीने कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करु नये व पुराव्यात छेडछाड व फेरफार करु नये.

इ. अर्जदार/आरोपी व जामीनदार यांनी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना यांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची सत्यप्रत सादर करावी.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.14 16:48:03 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक –१४/१०/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर.